# * उद्वाहन निरीक्षकांची कामे *

१) विद्युत निरीक्षक (उद्वाहन ) कार्यालया कडून महाराष्ट्र उद्वाहन कायदा १९३९ व महाराष्ट्र उद्वाहन नियमावली १९५८ ची अंमलबजावणी करण्यात येते ज्यायोगे महाराष्ट्रात नव्याने बसविल्या जाणाऱ्या उद्वाहनांचा आराखडा नियमानुसार योग्य आढळून आल्यास उद्वाहन उभारण्याची परवानगी दिली जाते व तदनंतर उद्वाहानाचे काम पूर्ण झाल्यावर त्याचे उद्वाहन सुरक्षेच्या दृष्टीकोनातून प्रथम निरीक्षण करून उद्वाहांची उभारणी नियमानुसार योग्य आढळून आल्यास उद्वाहन वापरण्याची अनुज्ञप्ती देण्यात येते.

२) उद्वाहन उभारण्याची परवानगी व उद्वाहन वापरण्याची अनुज्ञप्ती या सेवा ह्या महाराष्ट्र हक्क अधिनियम २०१५ चे नुसार आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने पुरविण्यात येतात.

३) उद्वाहनाचे वापरा दरम्यान त्याची त्याच्या वापरकर्त्यांच्या सुरक्षेसाठी नियतकालिक निरीक्षण करण्यात येते व सदर निरीक्षणा दरम्यान उद्वाहानाचे संचामाडणीत काही त्रुटी आढळून आल्यास वापरकर्त्यास व देखभाल दुरुस्ती करणाऱ्या उद्वाहन ठेकेदारास कळवुन सदर तृटी दूर करून घेण्याची कार्यवाही करण्यात येते.

४) सुरक्षितपणे वापर न केल्यास तसेच नियमांचे उल्लंघन केल्यामुळे व परिरक्षण करणाऱ्या अनुज्ञप्तीधारक ठेकेदारच्या निष्काळजीपणामुळे अपघात घडल्यास सदर अपघातांचे चौकशी करणे